# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२३

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

### रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्याचे विभाजन करुन नविन रायपाटण तालुक्याच्या निर्मितीबाबत

**(१) २२८९ (२२-११-२०२२) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्याचे विभाजन करुन नविन 'रायपाटण' तालुका निर्मितीची रितसर मागणी रायपाटण ग्रामपंचायतीने दिनांक १ नोव्हेंबर, १९९० रोजी व तद्नंतर सातत्याने लोकप्रतिनिधीसह ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री आदींकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी अनेकवेळा विधानमंडळाच्या दोनही सभागृहात अनेक मा.सदस्यांनी विविध संसदीय मार्गाने ही बाब सभागृहात उपस्थित केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, 'रायपाटण' तालुका निर्मितीबाबत राज्य शासनाने यापूर्वी सर्व्हे करुन नियोजित 'रायपाटण' तालुक्याचा नकाशा तयार केला असून शासनाच्या नविन तालुका निर्मितीच्या यादीत 'रायपाटण' तालुक्याचा समावेश केलेला असूनही 'रायपाटण' या नविन तालुक्याची निर्मिती न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, रायपाटण' नविन तालुका निर्माण करण्याचे दृष्टीने शासनाने कोणता ठोस निर्णय घेतला आहे काय, असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन 'रायपाटण' या नविन तालुक्याची निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०६-०१-२०२३) :** (१), (२) व (३) सदर धोरणात्मक विषयी वित्त विभागाने राज्यातील तालुक्याचे विभाजन करतांना काळानुरूप माहिति तंत्रज्ञानात झालेल्या सुधारणा व महसूली सेवांचे झालेले संगणकीकरण या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन नव्याने निकष ठरविण्यासाठी नवीन समिती गठीत करुन त्यांच्या शिफारशी प्राप्त करुन त्यानुसार तालुका विभाजनाची कार्यवाही प्रस्तावित करणे उचित होईल या प्रमाणे अभिप्राय दिले असून त्यास अनुसरुन तालुका पुनर्रचना समिती स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

## राज्यातील मोठ्या जिल्ह्यांचे विभाजन आणि त्रिभाजन करण्यात येत असल्याबाबत

**(२) २७९९ (२२-११-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक : तारांकित प्रश्न क्रमांक ४१६९३ ला दिनांक ६ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मोठ्या जिल्ह्यांचे विभाजन आणि त्रिभाजन करण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नवीन २२ जिल्ह्यांमध्ये आंबेजोगाई, पंढरपूर तालुक्यांचे जिल्ह्यात रुपांतर करण्याबाबत तसेच, गडचिरोली जिल्ह्याचे विभाजन करुन नविन जिल्हा निर्मिती करण्यात येवून, ४९ नविन तालुक्यांची निर्मिती करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, जिल्हा व तालुका याठिकाणी सर्व पायाभूत सोयी सुविधासाठी निधीची तरतूद केली आहे काय, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील अस्तित्वात असलेल्या जिल्ह्यांचे विभाजन/ पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरावर कोणते निकष विचारात घ्यावे ही एक धोरणात्मक बाब असून सद्य:स्थितीत जिल्हयांचे विभाजन /पुनर्रचना करण्याकरिता निकष ठरविण्याबाबतची कार्यवाही सुरू असून सदर निकष निश्चित झाल्यानंतर जिल्हा विभाजनाच्या निकषांच्या अनुषंगाने प्रकरणपरत्वे उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

वित्त विभागाने राज्यातील तालुक्यांच्या विभाजन करतांना काळानुरूप माहिती तंत्रज्ञानात झालेल्या सुधारणा व महसूली सेवांचे झालेले संगणकीकरण या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन नव्याने निकष ठरविण्यासाठी नवीन समिती गठीत करुन त्यांच्या शिफारशी प्राप्त करुन त्यानुसार तालुका विभाजनाची कार्यवाही प्रस्तावित करणे उचित होईल या प्रमाणे अभिप्राय दिले असून त्यास अनुसरुन तालुका पुनर्रचना समिती स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक भरती सुरू करणेबाबत

**(३) ४३७७ (०८-०९-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षक भरती मागील अनेक वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिकविण्यास पुरेसे शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षक भरती सुरू करण्याबाबत कोणती उपायायोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) सद्य:स्थितीत राज्यातील शिक्षक भरतीस वित्त विभागाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात महामार्ग प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्त दाखला मिळणेबाबत

**(४) ५५८२ (१३-१२-२०२०) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सध्या अनेक महामार्गाचे प्रकल्प सुरु असून शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहीत करण्याची प्रक्रिया चालू आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामार्ग प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्त म्हणून दाखला देण्यात शासकीय पातळीवर अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्त दाखला देण्याचे निकष काय आहेत, राज्यात किती शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी अधिग्रहीत करुन त्यांना प्रकल्पग्रस्त म्हणून दाखला देण्यात आला आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१५-१२-२०२२) :** (१) होय.

राष्ट्रीय महामार्गासाठी भूसंपादनाची कार्यवाही राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अन्वये करण्यात येते.

(२) व (३) भूमि संपादन व पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ हा राज्यात दिनांक ०१/०१/२०१४ पासून अंमलात आला आहे.

उक्त अधिनियमातील कलम २६ ते ३० मधील तरतूदींनुसार जमिनीचे दर /मूल्यांकन परिगणित करून राज्यातील महामार्गाकरिता जमिनीचे संपादन करण्यात येत आहे.

उक्त अधिनियमाच्या अनुसूची-दोननुसार बाधित कुटुंबांना पुनर्वसनाचे लाभ देण्यात येत असून प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्याबाबत कोणतीही तरतूद सदर अधिनियमामध्ये नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोकणातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यामध्ये अवकाळी पाऊस व चक्रीवादळामुळे अनेक गावांचे नुकसान झाल्याबाबत

**(५) ८७९४ (०९-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग), चिपळूण व खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अनेक गांवाना अवकाळी पाऊस व चक्रीवादळाचा तडाखा बसून घरे, फळबागा इत्यादींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे दिनांक ७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकणातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात झालेला अवकाळी पाऊस व चक्रीवादळ यामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन बाधितांना नुकसान भरपाई देण्याची मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोकणातील किती कुटुंबे, आस्थापना यांचे वादळामुळे नुकसान झाले आहे, संबंधित कुटुंबांसाठी शासनाने कोणते पॅकेज जाहीर केले आहे, संबंधित पॅकेजचे वाटप किती कुटुंबे व आस्थापनांना करण्यात आले आहे,
(४) असल्यास, ३० टक्के नुकसान असेल तरच मदत असे शासनाने धोरण ठरविले आहे काय, सुपारीच्या झाडासाठी २० रुपये व नारळाच्या झाडासाठी ४० रुपये मदत देण्यात येणार आहे काय, तसेच सरासरी ५ ते १० हजार, सरासरी १० ते १५ हजार, सरासरी १५ हजार ते २० हजार आणि २० हजारांपुढे अशा टप्प्यात मदत मिळालेल्या कुटुंबांची संख्या किती आहे,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोकणात अवकाळी पाऊस व चक्रीवादळाचा तडाखा बसून घरे, फळबागा इत्यादीं झालेल्या नुकसानीची भरपाई बाधिताना तात्काळ मिळावी यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३१-०१-२०२३) :** (१) नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुक्यामध्ये तसेच, रत्नागिरी जिल्ह्यामध्ये दिनांक ०७ मे, २०२१ रोजी १६ मि.मी. अवकाळी पावसाची नोंद आहे. त्यामध्ये घरांचे, शासकीय मालमत्तेचे नुकसान झालेले असून फळबागांचे नुकसान झालेले नाही. तथापि, १७ मे २०२१ दरम्यान झालेल्या तौक्ते चक्रीवादळामुळे रत्नागिरी जिल्ह्यात घरे, फळबागा यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.
(२) होय.
(३) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुक्यातील मौजे.अरुळेगावामधील ०९ घरांचे अंशत: नुकसान झालेले आहे. तसेच एका प्राथमिक शाळेच्या आणि एका हायस्कुलचे पत्र्याचे नुकसान झालेले आहे. तसेच, रत्नागिरी जिल्ह्यामध्ये दिनांक १७ मे, २०२१ दरम्यान झालेल्या तौक्ते चक्रीवादळामुळे घरे, फळबागा यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तौक्ते चक्रीवादळामध्ये २ व्यक्ती मृत झाल्या असून ९ व्यक्ती जखमी झाल्या. १२ पशुधनाचे नुकसान झाले असून १८ घरांचे पूर्णत: व १५ टक्के, २५ टक्के, ५० टक्के असे एकूण ४५४८ अंशत: घरांचे नुकसान झाले. ३१ झोपड्यांचे नुकसान झाले व ४५२ गोठ्यांचे व ३५ दुकान-टपऱ्यांचे नुकसान झाले. १०३ बोटींचे अंशत:, ३ बोटींचे पूर्णत: व २७८ जाळयांचे पूर्णत: नुकसान झाले. २४३७.९७ हे.आर. शेती/फळबागांच्या क्षेत्राचे नुकसान झाले आहे. तौक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन बाधित झालेल्या व्यक्तींना शासन निर्णय क्र.सीएलएस-२०२१/प्र.क्र.१३८/म-३, दिनांक २३ जून,२०२१ अन्वये रत्नागिरी जिल्ह्यासाठी रुपये २११७.६० लक्ष व सिंधुदूर्ग जिल्ह्यासाठी रुपये ४५४९.३३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे.

(४) तौक्ते चक्रीवादळामुळे बाधित झालेल्या नागरिकांना मदत देण्याबाबत शासन निर्णय क्र.सीएलएस-२०२१/ प्र.क्र.१३८/म-३, दिनांक ०३ जून, २०२१ अन्वये मदतीचे दर निश्चित केले आहेत. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार ३३ टक्के पेक्षा जास्त शेती पिकांचे नुकसान झाले असल्यास मदत अनुज्ञेय आहे. त्यानुसार बहुवार्षिक पिकांसाठी प्रति हेक्टरी रुपये ५०,०००/- मदत अनुज्ञेय करण्यात आली आहे. शेती पिकांच्या नुकसानीसाठी रत्नागिरी जिल्ह्यासाठी रुपये १२१२.१७ लक्ष व सिंधुदूर्ग जिल्ह्यासाठी रुपये १७०३.८१ लक्ष इतक्या रकमेचे वाटप करण्यात आले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्याच्या शिक्षण विभागाकडून शिक्षक प्रशिक्षण प्रणालीसाठी कोट्यवधीची निविदा काढण्यात आल्याबाबत

**(६) ९५८९ (२०-०७-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या शिक्षण विभागाने शिक्षक प्रशिक्षणासाठी केंद्राची प्रणाली असताना तसेच मागील दोन वर्षापूर्वीपासून राज्याचा शिक्षण विभाग 'दीक्षा' या केंद्र शासनाच्या प्रणालीचा वापर करीत असतानाही, स्वतंत्र प्रणाली निर्माण करण्यासाठी शासनाने रुपये ३० कोटींची निविदा काढली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील वर्षी शाळा बंद झाल्यानंतर केंद्र शासनाच्या 'दीक्षा' या प्रणालीची प्रसार मोहिम राज्याच्या शिक्षण विभागाने सुरू केली होती, विद्यार्थ्यांना ई-साहित्य उपलब्ध करून देण्याबरोबरच शिक्षक प्रशिक्षणाचीही सुविधा सदरहू प्रणालीवर उपलब्ध असून शिक्षक नोंदणीपासून ते शिक्षकांना प्रशिक्षण प्रमाणपत्र देण्यापर्यंत सर्व सुविधांसह स्वतंत्र संकेतस्थळ उपयोजना (ॲप) निर्मिती करण्याचा निर्णय घेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्राची मोफत यंत्रणा असतानाही राज्याच्या शिक्षण विभागाने शिक्षक प्रशिक्षक प्रणालीसाठी रुपये ३० कोटीची निविदा काढण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१५-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) राज्य शासनाद्वारे दरवर्षी प्रत्यक्ष प्रशिक्षणाचा उपयोग शिक्षक अध्ययनासाठी कितपत करतात, प्रशिक्षणामुळे अध्ययन/अध्यापन सुलभ झाले का, अध्ययन पध्दतीमध्ये सुधारणा/बदलामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ झाली किंवा कसे याबाबीचे मूल्यांकन करण्यासाठी कोणतीही ऑफलाइन/ ऑनलाईन पध्दती अस्तित्वात नाही. त्यामुळे ऑनलाईन पध्दतीद्वारे विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यासाठी व मुल्यांकन करण्यासाठी ONLINE TEACHER TRAINING PLATFORM तयार करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता, तथापि, त्याबाबत निर्णय झाला नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील कामठी तालुक्यातील अवैध विट भट्टयाबाबत

**(७) १३२६४ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खैरी, खसाळा, मसाळा, कवठा, वारेगांव, सुरादेवी, शिरपुर, पावनगांव (ता.कामठी, जि.नागपूर) सह अन्य शिवार "ग्रीन बेल्ट" असूनही महसूल विभागाने अधिकृत वीट भट्टयाची परवानगी दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामठी तालुक्यात या अधिकृत व नियमाबाहय अनधिकृत वीट भट्टयामुळे प्रदुषणात वाढ तथा बालकामगार कायद्याचे उल्लंघन करून अनेक बालमजुरांकडून कामे करून घेतले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, महसूल विभागाने १ ब्रास माती पासून १५०० विटा बनविण्याची परवानगी असताना वीट भट्टी धारक ३००० विटांची निर्मिती करून मिळालेला रॉयल्टीचा वापर वारंवार करीत असल्यामुळे महसुलाचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, महसूल विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ तथा पोलीस प्रशासन कार्यवाही करण्यास दुर्लक्ष करीत आहे, हे खरे आहे काय ?
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने, अधिकृत व नियमाबाहय अनधिकृत वीट भट्टयामुळे प्रदुषणात होणारी वाढ थांबविण्याबाबत तथा बालकामगार कायद्याचे उल्लंघन करून अनेक बालमजुरांकडून कामे करणे बंद करण्याबाबत तसेच महसुलाचे होणारे नुकसान थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०६-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) कामठी तालुक्यातील वीट भट्यामुळे प्रदूषण होत असल्याची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच कामठी तालुक्यातील खैरी, खसाळा, मसाळा, कवठा, वारेगाव, सुरादेवी, शिरपूर, पावनगाव येथील विट्टभयांवर १८ वर्षाखालील बालकामगार काम करतांना आढळून आलेले नाही
(३) हे खरे नाही.
(४) व (५) तहसिलदार, कामठी यांचेकडून एकूण ३१ अनधिकृत विटभट्टयामध्ये वापरण्यात आलेल्या अनधिकृत मातीवर दंडात्मक कार्यवाही करून आदेश पारित करण्यात आले आहे. व यासंदर्भात एकूण ३१ प्रकरणामध्ये रुपये १,७१,६८४/- वसुल करून शासन खाती जमा करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मच्छिमार नौकांना तातडीने डिझेल परतावा अदा करण्याबाबत

**(८) १३३०१ (३०-०३-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १०, ७०० यांत्रिक मच्छीमार नौका असून त्यापैकी बहुतांश नौका डिझेल कोटा मिळत नसल्याकारणाने विना वापर धक्क्यावर नांगरून ठेवण्यात आल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना कालावधीत मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून त्यात डिझेल परतावा मिळत नसल्याने त्यांना आर्थिक संकटास सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील मच्छिमार नौकांना तातडीने डिझेल परतावा अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (०९-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

सन २०२१-२२ या वर्षी डिझेल कोटा समितीद्वारे १५१ मच्छीमार सहकारी संस्थांच्या एकूण ९०३८ मासेमारी यांत्रिक नौकांना त्यांना आवश्यक असणारा वार्षिक डिझेल कोटा मंजूर करण्यात आलेला आहे.

(२) कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून संपूर्ण देशात दिनांक २५/०३/२०२० पासून लॉकडाऊन घोषित करण्यात आला होता.केंद्र शासनाकडून दिनांक १०/०४/२०२० च्या आदेशान्वये लॉकडाऊन मधून सागरी मासेमारी तसेच मत्स्यसंवर्धन उद्योगक्षेत्र व या क्षेत्राशी निगडीत पुरक व्यवसायास सूट देण्यात आली होती. केंद्र शासनाकडून प्राप्त निर्देशाच्या अनुषंगाने आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाकडून दिनांक २०/०४/२०२० अन्वये आदर्श कार्यप्रणाली निश्चित करण्यात आली होती.

डिझेल तेलावरील विक्रीकराची प्रतिपुर्ती या योजनेंतर्गत सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी रुपये ६०.०० कोटी इतका अर्थसंकल्पीत निधी व पूरक मागणीद्वारे मंजूर रुपये ५०.०० कोटी एकूण रुपये ११० कोटी निधी आयुक्त कार्यालयास वितरित करण्यात आलेला आहे.

(३) डिझेल तेलावरील विक्रीकराची प्रतिपुर्ती या योजनेंतर्गत सन २०२२-२३ या चालू आर्थिक वर्षासाठी रुपये ६३.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. रुपये ६३ कोटीपैकी रुपये ३१.५० कोटी निधी आयुक्त कार्यालयास वितरीत करण्यात आलेला आहे.

सन २०२२-२३ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये रुपये १०० कोटी निधी पुरक मागणीद्वारे मंजूर असून सदर निधी व अर्थसंकल्पित निधीपैकी उर्वरीत निधी रुपये ३१.५० कोटी वितरीत करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

डिझेल तेलावरील विक्रीकराची प्रतिपुर्ती या योजनेंतर्गत सन २०२२-२३ करिता हिवाळी अधिवेशनामध्ये रुपये १२९.१० कोटी रकमेचा पूरक मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामीणअर्थव्यवस्थेच्या मजबुतीसाठी पशुसंवर्धन विभागात २५०० रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) १३६९३ (२५-०८-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: ग्रामीण भागातील पशुसंवर्धन विभागात २५०० कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याची बाब दिनांक २२ मे, २०२२ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त पदांचा अहवाल शासनाने मागवावा याबाबत लोकप्रतिनिधीना लेखी निवेदने दिली आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रिक्त पदांच्या भरतीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०१-२०२३) :** (१) व (२) राज्यातील विविध संवर्गातील रिक्त पदांचा अहवाल मागविण्याबाबत शासनास कोणतीही निवेदने प्राप्त झालेली नाहीत. राज्यातील पशुसंवर्धन विभागाअंतर्गत मंजूर, भरलेली व रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे –

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| गट-अ | २६४४ | २१७८ | ४६६ |
| गट-ब | ४१९ | ७३ | ३४६ |
| गट-क | १८९५ | ७७४ | ११२१ |
| गट-ड | १९०५ | ७६० | ११४५ |
| एकूण | ६८६३ | ३७८५ | ३०७८ |

पशुवैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमीतपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.
(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यानंतर त्याद्वारे सदरहू रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे. वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२० अन्वये नवीन पद भरती न करण्याबाबत निर्देश असल्यामुळे बाह्य स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात २६२ पशुधन पर्यवेक्षकांची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आलेली होती. तथापि, लम्पी चर्मरोग प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २९३ पदे आणि पशुधन पर्यवेक्षकांची ११५९ पदे (राज्य स्तर २८६ व जिल्हा परिषद स्तर ८७३) कंत्राटी पध्दतीने भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच दरम्यानच्या कालावधीत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये पदभरतीवरील निर्बंध शिथील करण्यात आल्यामुळे नवीन पदभरतीद्वारे गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील अल्ट्राटेक सिमेंट कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(१०) १४१०९ (२५-०८-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या माणिकगड यूनिट मधून वायू निर्माण होत असल्याने अल्ट्राटेक कंपनीला कारणे दाखवा नोटीस प्रदूषण विभागाकडून देण्यात आल्याचे दिनांक ०८/०५/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अल्ट्राटेक सिमेंट कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०१-२०२३) :** (१) होय खरे आहे.
(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रदूषण नियंत्रण कृती समिती, गडचांदूर यांची मे. अल्ट्राटेक सिमेंट युनिट माणिकगड या उद्योगाविरूध्द हवा प्रदूषणाची तक्रार दिनांक १६/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २५/०४/२०२२ रोजी उद्योगाची पाहणी करण्यात आली व पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उद्योगास दिनांक २८/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली होती.

दिनांक ११/०७/२०२२ रोजी उद्योग प्रतिनिधीसोबत सुनावणी घेण्यात येऊन, उद्योगास दिनांक १०/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदर उद्योगाने संमतीपत्रातील अटींचे उल्लंघन केल्याने उद्योग बंद का करण्यात येऊ नये, याबाबत कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे. तसेच रुपये ५० लाख बँकहमी जप्त करण्याबाबत दिनांक १०/०८/२०२२ रोजी निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगाची दिनांक १९/०८/२०२२ रोजी पुनश्च पाहणी करण्यात आली असून, पाहणी दरम्यान, उद्योगाने हवा प्रदूषण नियंत्रणाकरिता सुधारणा केल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील बंजारा समाजाचा तांडा वस्त्यांसाठी स्वतंत्र महसुली गाव जाहीर करण्याबाबत

**(११) १४१४० (२५-०८-२०२२) श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा : दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १४ मधील प्रश्न क्रमांक १०९७१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बंजारा समाजाच्या तांड्यामध्ये राहणाऱ्या नागरिकांना शासनाच्या सोयी-सुविधा उपलब्ध होत नसल्यामुळे तांडा वस्त्यांसाठी स्वतंत्र महसुली गाव जाहीर करण्याबाबत शासन कार्यवाही करणार आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४(१) नुसार किमान एक हजार लोकसंख्या असण्याची अट तांडा वस्त्यांसाठी शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०१-२०२३) :** (१) व (२) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४ पोट-कलम (१) खंड (सहा) मध्ये ३०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या वाड्या/तांडे/वस्त्या यांना स्वतंत्र महसूली गावांचा दर्जा देण्याबाबत तरतूद आहे. त्याबाबतचे शासनाचे अधिकार शासन अधिसूचना क्र.टिएलसी/१०७६/६३९२३/म-६, दिनांक ०१/०७/१९७६ अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी यांचे स्तरावर प्राप्त प्रस्तावांवर नियमोचित कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील बहुतांश ठिकाणी बंजारा समाजाच्या पात्र तांड्यांना महसुली गावाचा दर्जा देण्याची कार्यवाही महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४ पोट-कलम (१) खंड (सहा) अन्वये करण्यात आलेली आहे. जोपर्यंत विहीत प्रक्रिया पूर्ण करुन पात्र तांड्यांचे महसूली गावात रुपांतर होत नाही तोपर्यंत संबंधित तांड्यांना तसेच कमी लोकसंख्या असलेल्या तांड्यांना मूळ महसुली गावांतर्गत विविध शासकीय योजनांमधून मूलभूत सुविधा पुरविण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सहकार क्षेत्रातील गटसचिवांच्या समस्या सोडविण्यासाठी अकोला-वाशिम मॉडेल राबविण्याबाबत

**(१२) १४१५३ (२५-०८-२०२२) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सहकार क्षेत्रात विविध कार्यकार संस्थांमध्ये काम करीत असलेल्या गटसचिवांच्या समस्या सोडविण्यासाठी अकोला - वाशिम मॉडेल राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अकोला मॉडेल संदर्भात शासनाने सात सदस्यांचे अभ्यासगट नेमण्याचे व या अभ्यासगटाचा अहवाल महिनाभरात शासनास सादर करण्यात येणार असल्याचे दिनांक १६ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अभ्यासगटाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास केव्हा, त्यानुसार शासनाने त्याबाबत पुढे कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०८-१२-२०२२) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने संवर्गीकरण योजनेच्या धर्तीवर गटसचिवांच्या समस्या सोडविण्यासाठी एका नव्या प्रकारच्या संस्थेची निर्मिती केली आहे. सदर संस्थेचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमून त्या समितीच्या अहवालानुसार सहकार आयुक्तालयाने शासनास शिफारशी सादर कराव्यात, असे निर्देश दिनांक १५/०२/२०२२ रोजीच्या मा.मंत्री (सहकार व पणन) यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने देण्यात आले. त्यानुसार १२ सदस्यांची समिती गठीत करण्यात आली आहे.

(३) सदर अभ्यासगटाचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापुर जिल्ह्यातील द्राक्ष शेतीच्या झालेल्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

**(१३) १४२९५ (०४-०७-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात सुमारे २५ हजार एकर द्राक्ष बागांचे क्षेत्र असून सतत कमी जास्त होणारे तापमान, अवकाळी पाऊस यामुळे द्राक्ष मालाचा दर्जा ढासळला असून वाढत्या उन्हामुळे या द्राक्षापासून बेदाणा होत नसल्याने घड बांधावर काढून टाकले जात असून सुमारे ४ हजार एकर द्राक्ष बागांचा माल तसाच पडून असल्याचे दिनांक ३० मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने असमतोल वातावरण,मान्सूनपूर्व पावसाने दिलेला तडाखा यामुळे तयार होत असलेल्या द्राक्षांच्या बागा उध्वस्त झाल्याने सोलापूर जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले त्यांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१७-०८-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नोव्हेंबर, २०२१ ते मे, २०२२ या कालावधीत गारपीट व अवेळी पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या व मालमत्तेच्या बाधित व्यक्तींना महसूल व वन विभाग क्र. सीएलएस-२०२२/प्र.क्र.०८/म-३, दिनांक ०८/०८/२०२२ च्या शासन निर्णयान्वये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून मदत देण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून सोलापूर जिल्ह्यासाठी एकूण रुपये ४७०.९१ लक्ष एवढा निधी वितरित करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुराधा नागरी सहकारी बँकेने (ता.चिखली, जि.बुलढाणा) बँकेने कर्जमाफीमध्ये शासनाकडून अतिरिक्त वसूल केलेल्या रकमेची वसुली करण्याबाबत

**(१४) १४५५४ (२५-०८-२०२२) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, डॉ. रणजित पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.नागोराव गाणार, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राजहंस सिंह, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुराधा नागरी सहकारी बँकेने (ता.चिखली, जि.बुलढाणा) सन २००८ या कालावधीतील कर्जमाफीत बोगस कागदपत्रांच्या आधारे २.२६ कोटी रुपये शासनाकडून अतिरिक्त वसूल करुन शासकीय रक्कमेचा अपहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रकमेची वसुली करण्याचे आश्वासन शासनाने दिले असून त्यासंदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदर बँकेने शासकीय रक्कमेचा अपहार केला असून त्यानुषंगाने शासनाने सदरची रक्कम संबंधितांकडून तात्काळ वसूल करावी, संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०९-१२-२०२२) :** (१) याप्रकरणी अद्याप चौकशी सुरु आहे.
(२), (३) व (४) याप्रकरणी चौकशी पथक नियुक्त करण्यात आले आहे. तथापि, अनुराधा नागरी सहकारी बॅकेने मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपिठ नागपूर येथे दावा दाखल केला असून मा.उच्च न्यायालयाने चौकशी आदेशास स्थगिती दिली आहे. सदर स्थगिती आदेशाविरुध्द शासनाची बाजू मा.उच्च न्यायालयात मांडण्यासाठी विशेष विधितज्ञाची (special consellor) नियुक्ती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्ह्यात फाळणीदरम्यान नागरिकांची शेती, मालमत्ता शासन दरबारी जमा झाली आहे अशा जिल्ह्यातील अनेक जमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे होत असल्याबाबत

**(१५) १४७७० (२५-०८-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्ह्यात फाळणीदरम्यान नागरिकांची शेती, मालमत्ता शासन दरबारी जमा झाली असून या जिल्ह्यातील अनेक जमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे होत असल्याचे नुकतेच माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अब्दीमंछी परिसरात तब्बल दिडशेहून अधिक एकर जमिनीवर अनेकांनी घरे, दुकाने, हॉटेल्स आणि फार्महाऊस बांधून अतिक्रमण केल्याचे तसेच कांही भूमाफियांनी याच जागेवर प्लॉटिंग टाकून त्याची विक्रीदेखील सुरु केल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे तात्काळ हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०२-१२-२०२२) :** (१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे. अपर तहसिलदार औरंगाबाद यांच्या अहवालानुसार मौजे माळीवाडा (अब्दीमंडी), ता.व जि.औरंगाबाद येथील जागेवरती शेती / निवासी प्रयोजनासाठी अतिक्रमणे झाली होती. सदरची अतिक्रमणे तत्कालीन तहसिलदार यांनी निष्कासीत केली असून, वेळोवेळी अतिक्रमणे निष्कासीत करण्यात कार्यवाही सुरू आहे. याविरूध्द अतिक्रमण धारकांनी मा.दिवाणी न्यायालय, औरंगाबाद येथे RCS No.४०५/२०१९, RCS No.८६३/२०१९, RCS No.१०४२/२०१९ दावे दाखल केले आहेत. तसेच मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.१२५६५/२०१८ दाखल केली असून, सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) व (४) मौजे माळीवाडा (अब्दीमंडी), ता. व जि.औरंगाबाद येथील सर्वे नं. ४८, ५१, ५९, ६०, ८२, ८६, १०२, १०३, १०५ या निर्वासित मालमत्तांची प्रत्यक्ष मोजणी करून मोजणी अहवाल नकाशा सादर करून, संबंधित निर्वासित मालमत्तांची हद्दिखुणा निश्चित करणेबाबत तसेच निर्वासित मालमत्तेवर त्रयस्त व्यक्तींनी अनधिकृत अतिक्रमण केले असल्याचे आढळून आल्यास, सर्व संबंधित अतिक्रमण धारकांचे नाव, अतिक्रमित क्षेत्राचा तपशिल व अतिक्रमित क्षेत्राचे स्वरूप याबाबतचा सविस्तर स्थळ पाहणी करून चौकशी अहवाल सादर करण्याबाबत अपर तहसिलदार औरंगाबाद व उप अधीक्षक औरंगाबाद यांना जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी निर्देश दिले आहेत.

---

## नागपूर (ता.काटोल व नरखेड) जिल्ह्यातील १७ गावातील पशुवैद्यकीय दवाखान्यात कायमस्वरूपी पशुवैद्यकीय डॉक्टर्स नियुक्त करणेबाबत

**(१६) १४९५१ (०८-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर (ता.काटोल व नरखेड) जिल्ह्यातील १७ गावातील पशुवैद्यकीय दवाखान्यात मागील अनेक वर्षापासून पूर्ण वेळ डॉक्टर्स नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पशु वैद्यकीय डॉक्टर्स अभावी पशुंना उपचार न मिळाल्याने अनेक जनावरांचे मृत्यू होवून दुध उत्पादनात मोठी घट झालेली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, नरखेड व काटोल तालुक्यातील चार खाजगी डॉक्टरांना मानधन न मिळाल्याने तेही सोडून गेलेले आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने १७ गावातील पशुवैद्यकीय दवाखान्यात कायमस्वरूपी पशुवैद्यकीय डॉक्टर्स नियुक्त करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०१-२०२३) :** (१) व (२) नागपूर जिल्ह्यातील काटोल व नरखेड तालुक्यांतील पशुसंवर्धन विभागातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची मंजूर, भरलेली व रिक्त पदांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे-

| पद | मंजूर | भरलेली | रिक्त |
|---|---|---|---|
| सहायक आयुक्त पशुसंवर्धन | ०१ | ०० | ०१ |
| पशुधन विकास अधिकारी | ११ | ०८ | ०३ |
| सहायक पशुधन विकास अधिकारी | ०५ | ०३ | ०२ |
| पशुधन पर्यवेक्षक | ०७ | ०४ | ०३ |
| व्रणोपचारक | ०७ | ०७ | ०० |
| एकूण | ३१ | २२ | ०९ |

पशुवैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमीतपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत असून, औषधोपचाराविना पशुधनाच्या मृत्यूची कोणतीही नोंद झालेली नाही व दुध उत्पादनात घट झाल्याबाबत निदर्शनास आले नाही.

(३) चार पशुधन पर्यवेक्षकांची बाह्यस्त्रोताद्वारे नेमणूक करण्यात आली होती, तथापि, त्यांच्या कराराची मुदत संपल्यामुळे त्यांच्या सेवा संपुष्टात आल्या होत्या. सध्या पशुधन पर्यवेक्षकांची बाह्यस्त्रोताद्वारे नेमणूक करण्यात आलेली आहे.

(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यानंतर त्याद्वारे सदरहू रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे. तसेच वित्त विभाग शासन निर्णय

दिनांक ०४/०५/२०२० अन्वये नवीन पदभरतीवर निर्बंध होते, तथापि, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये पदभरतीवरील निर्बंध शिथील करण्यात आल्यामुळे नवीन पदभरतीद्वारे गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोठारी (ता.बल्लारपुर) गावाशेजारी कंत्राटदाराने बंधारा बांधकामात अवैध दगडाचा वापर केल्यामुळे लाखोचा महसूल बुडाल्याबाबत

**(१७) १४९८९ (०८-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोठारी (ता.बल्लारपुर) गावाशेजारी राष्ट्रीय महामार्ग सार्वजनीक बांधकाम विभाग गडचिरोली अंतर्गत ठेकेदाराकडून बंधाराच्या बांधकामात अवैध दगडाचा वापर केल्यामुळे लाखोचा महसूल बुडविल्याबाबत वृत्त प्रकाशीत झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक तलाठी यांनी फक्त २५ ब्रास जप्तीची कार्यवाही केलेली असून सुध्दा तालुका स्तरावर कुठलीही दंडात्मक कार्यवाही झाली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बंधारासाठी लागणारा दगड कुठून वाहतूक करायचा व किती ब्रास लागणार याचा लेखाजोगा अंदाजपत्रकात नमूद असूनही अवैधरित्या वापर करण्यास अभियंतानी संमती दिल्यामुळे शासनाचा महसूल बुडाल्यामुळे अभियंता व ठेकेदारावर गुन्हा दाखल करून त्यांच्यावर दंड आकारून कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०६-१२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) तलाठी, कोठारी यांनी २५ ब्रास दगडाचा वापर अनाधिकृतरित्या करीत असल्याचे निदर्शनास आल्याने जप्तीची कारवाई केली व याप्रकरणी तहसिलदार, बल्लारपूर यांनी संबंधित कंत्राटदारावर २५ ब्रास दगड या गौण खनिजाचा अनाधिकृत वापर

केल्याने त्याच्यावर रुपये ३,९०,०००/- चा दंड आकरण्यात आला. यानुसार कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, गडचिरोली यांच्या कार्यालयाकडून संबंधित कंत्राटदार यांचे रुपये १,९०,६२७/- प्रथम चालू देयकांमधून कपात करण्यात आली आहे.

---

## ठाणे खाडी,घोडबंदर येथे एम.एम.आर.डी.ए. तर्फे नवीन किनारी पूल बांधण्याबाबत

**(१८) १५३०४ (२९-१२-२०२२) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे खाडी, घोडबंदर येथे नेहमी वाहतूक कोंडी होत असल्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) तर्फे नवीन किनारी पूल बांधण्याबाबत राज्य शासनाने माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या किनारी पूल प्रकल्पाला किती खर्च येणार आहे,
(३) असल्यास, सदर पूल किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, या पूलाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०१-२०२३) :** (१), (२), (३) व (४) ठाणे शहरातील बाळकुम ते गायमुख या घोडबंदर रस्त्यास पर्यायी मार्ग असणाऱ्या प्रस्तावित ठाणे खाडी किनारा मार्ग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यास प्राधिकरणाच्या दिनांक १६/११/२०२१ रोजीच्या १५१ व्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. सदर रस्त्यांची लांबी १३.४३ कि.मी. इतकी आहे. सदर कामाची अंदाजित रक्कम रु १३१६.१८ कोटी इतकी असून सदर कामाकरिता भूसंपादन व इतर आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्यानंतर आणि कार्यारंभ आदेश दिल्याच्या तारखेपासून काम पूर्ण करण्याकरिता ३६ महिने कालावधी अपेक्षित आहे.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०२१ मध्ये परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्याबाबत

**(१९) १५६३५ (२९-१२-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.अरुण लाड, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत मृद व जलसंधारण, जलसंपदा आणि सार्वजनिक बांधकाम या तीन विभागातील श्रेणी-१ आणि श्रेणी-२ च्या अभियंता पदाकरिता सन २०२१ मध्ये झालेल्या परिक्षेत उत्तीर्ण होऊन निवड झालेल्या ११४३ उमेदवारांना नियुक्ती न मिळाल्यामुळे उमेदवारांनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ ते २ नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आझाद मैदान, मुंबई येथे साखळी उपोषणाला बसण्याचा निर्णय घेऊन उमेदवारांवर आत्महत्येची वेळ येवू नये अशी विनंती शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच दरम्यान, राज्यसेवा २०१९, इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी सेवा २०१९, वनसेवा २०१९, राज्यसेवा २०२० व अशा अन्य अनेक परीक्षा उत्तीर्ण होऊ निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती मिळाली असून लोकसेवा आयोग, २०१९ मध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०२१ मध्ये परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०१-२०२३) :** (१) व (२) महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा परीक्षा, २०१९ मधील जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभाग, मृद व जलसंधारण विभागांच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांपैकी मा.उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेवून EWS (आर्थिकदृष्टया दुर्बल घटक) व्यतिरिक्त एकूण १०३२ उमेदवारांना दिनांक ०१/१२/२०२२ रोजी नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत. तसेच मा.उच्च न्यायालयाने प्रकरण निकाली काढल्याने व मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीरणाकडे EWS प्रवर्गाच्या एकूण १११ उमेदवारांच्या नियुक्तीबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट होते. त्यापैकी दिनांक २२/१२/२०२२ रोजी EWS प्रवर्गातून अर्ज केलेल्या व EWS मध्ये शिफारस केलेल्या १७ उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने मान्यता /मंजूरी दिली आहे. तथापि, उर्वरित ९४ EWS उमेदवारांच्या नियुक्तीबाबत प्रकरण अद्याप मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील वांद्रे व दहिसर परिसरात बोगस मतदार सापडल्याबाबत

**(२०) १५७४९ (२९-१२-२०२२) प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वांद्रे व दहिसर परिसरात ३ लाख ४२ हजार बोगस मतदार सापडल्याची माहिती माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खार, वांद्रे आणि सांताक्रूझ येथे ८ हजार रहिवाशांना निवडणूक आयोगाकडून खारच्या विधानसभा मतदार संघ कार्यालयात उपस्थित राहण्याच्या नोटीसा मिळाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर ३ लाख ४२ हजार बोगस मतदारांवर कारवाई करुन त्यांचे मतदान ओळखपत्र रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०१-२०२३) :** (१) अशी बाब नाही.

मतदार यादीच्या पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत दुबार/ कायमस्वरुपी स्थलांतरीत व मयत मतदार इत्यादीबाबत विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन कार्यवाही करण्यात आलेली असून ही निरंतर प्रक्रिया आहे.

तसेच, निवडणूक ही बाब भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे अखत्यारित असून यास राज्य शासन जबाबदार नसते.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.